


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २६१ •शनिवार,दि.२० डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# राज्यातील २३ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी



# आज मतदान, निवडणूक यंत्रणा सज्ज

**मुंबई । प्रतिनिधी**

• **सर्व पक्षांचा जोरात प्रचार– राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूकीची तयारी पूर्ण झाली आहे. मतदान अधिकारी मतदान केंद्रावर पोहचण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणूकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. सर्वच मोठे नेते प्रचारात सहभागी झाले होते. त्यामुळे या निवडणुकीतील रंगत आणखी वाढली आहे. आता मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीचे वारे वाहत आहेत. २ डिसेंबरला नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूकीसाठी मतदान पार पडले आहे. मात्र २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूका काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यामुळे आता राज्यातील २३ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्ष व सदस्यपदांसाठी; तसेच विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १४३ सदस्यपदांच्या जागांसाठी उद्या मतदान पार पडणार आहे. त्यानंतर २ डिसेंबरसह २० तारखेला होणाऱ्या मतदानाचा निकाल २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष या निकालावर असणार आहे.

आज मतदान, २१ तारखेला निकाल– राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर केला होता. त्यानुसार ०२ डिसेंबर २०२५ रोजी २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान झाले. मात्र २३ ठिकाणची निवडणूक काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आली होती. मात्र आता या ठिकाणी आज म्हणजेच २० डिसेंबरला मतदान पार पडणार आहे. त्यानंतर सर्व संबंधित ठिकाणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार आहे.

कोणत्या नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये मतदान होणार? उद्या म्हणजेच २१ तारखेला ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव, ▶ उर्वरित पान २ वर

## जवळगाव शिवारात अज्ञात व्यक्तीचा खून मृतदेह ज्वारीच्या शेतात फेकला, गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



तालुक्यातील जवळगाव शिवारात एका ३० वर्षीय अज्ञात तरुणाचा खून करून त्याचा मृतदेह ज्वारीच्या शेतात फेकून दिल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. मृतदेहाची पाहणी केली असता त्याच्या अंगावर गंभीर जखमा आढळून आल्या असून, अज्ञात आरोपींनी ही हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास बर्दापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक रमेश भिवा घुले (वय ३१) यांना या घटनेची माहिती मिळाली. जवळगाव येथील मंचक पंढरी ढवारे यांच्या गायरान जमिनीतील ज्वारीच्या पिकात एका पुरुषाचे प्रेत पालथे पडलेले असल्याचे स्थानिक नागरिक संतोष हारे यांनी कळवले होते. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता, मृत तरुणाच्या गळ्यात लाल रंगाचा हातरुमाल आणि अंगावर निळ्या रंगाची जीन्स पँट होती, मात्र अंगात शर्ट नव्हता.मृताच्या छातीवर, बरगड्यांवर, चेहऱ्यावर आणि गुप्तभागावर मारहाण केल्याच्या खुणा दिसून आल्या आहेत. शवविच्छेदन अहवालात गळा दाबल्यामुळे ▶ उर्वरित पान २ वर

## संतोष देशमुख हत्या प्रकरण: दोषारोप निश्चिती टळली, २३ डिसेंबरला पुढील सुनावणी

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीड येथील विशेष मकोका न्यायालयात सुरू झाली आहे. या सुनावणी दरम्यान सरकारी वकील उज्वल निकम यांच्या नियुक्तीवरून आणि पुराव्यांच्या तांत्रिक मुद्द्यांवरून जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. यामुळे आज होणारी दोषारोप निश्चिती टळली असून न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ डिसेंबर रोजी निश्चित केली आहे. सकाळी ११ वाजता सुनावणीला सुरुवात झाली तेव्हा सरकारी पक्षाच्या वतीने वकील बाळासाहेब कोल्हे यांनी सुरुवातीचा युक्तिवाद मांडला. यावेळी मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख न्यायालयात उपस्थित होते. सुनावणीत खळबळजनक वळण तेव्हा आले जेव्हा वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे वगळता इतर आरोपींनी उज्वल निकम यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेतला. निकम हे राजकीय पक्षाशी संबंधित असून त्यांची नियुक्ती राजकीय शिफारशीवरून झाली ▶ उर्वरित पान २ वर

## पालवन चौकात वेश्या व्यवसायावर AHTU चा छापा

**अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई, पिडीत महिलेची सुटका**
**वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दोघांवर पोस्टे शिवाजी नगर मधे गुन्हा दाखल**

**बीड । प्रतिनिधी**

याविषयी सविस्तर बातमी अशी की, अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना दिनांक १९/१२/२०२५ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत पालवण रोड ला, पालवण चौक जवळ, एक महिला एका पुरुषाच्या मदतीने आपल्या राहत्या घरामध्ये महिलांना बाहेरुन बोलावून, ▶ उर्वरित पान २ वर



## परळीत SBI ग्राहक सेवा केंद्रात चोरी, कुलूप तोडून लाखभर रुपये लंपास, घटना CCTV मध्ये कैद

**परळी । प्रतिनिधी**




बीडच्या परळी शहरातील हनुमान चौक परिसरात एसबीआय ग्राहक सेवा केंद्रात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केली. चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश करत तब्बल १ लाख १४ हजार ३०० रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने खळबळ उडाली आहे. चोरीचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. शटर तोडताना तीन चोरटे दिसत आहेत.

ग्राहक सेवा केंद्राचे चालक वैभव रोडे यांनी नेहमीप्रमाणे दिवसभर ग्राहक सेवा केंद्राचे कामकाज केले. दिवसभरात जमा झालेली १,१४,३०० रुपयांची रक्कम त्यांनी दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवली होती. रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून ते घरी गेले. पहाटे अज्ञात चोरट्यांनी ग्राहक सेवा केंद्रासह शेजारील दुकानांचे शटर तोडले होते. सकाळी ग्राहक सेवा केंद्राच्या शेजारील दुकानदारांनी वैभव रोडे यांना फोन करून कळवले की, आमचे दुकान फोडले असून तुमचेही दुकान फोडलेले आहे. शटरला कुलूप दिसत नाही. ही माहिती मिळताच वैभव रोडे तातडीने दुकानात दाखल झाले असता, शटरचे कुलूप तुटलेले व दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमधील सर्व रोख रक्कम चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परळीतील मध्यवर्ती भागातील दुकानातून चोरी झाल्याच्या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. परळी शहर माणिक नगर परिसरात ▶ उर्वरित पान २ वर

## सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; पतीसह 5 जणांवर गुन्हा दाखल

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील मेहर गल्ली येथे एका विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून स्वतःला पेटवून घेत जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मयत विवाहितेच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून आष्टी पोलीस ठाण्यात पतीसह पाच जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रुक्मिणी प्रदिप भालेराव असे मयत विवाहितेचे नाव आहे. त्यांनी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मेहर गल्ली येथील राहत्या घरी स्वतः ला पेटवून घेतले होते. त्यानंतर त्यांच्यावर अंबाजोगाई येथील सरकारी दवाखान्यात उपचार सुरू होते, मात्र उपचारादरम्यान २१ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री साडेअकरा वाजता त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी भागवत राजेंद्र डोरले, वय ३८ वर्ष, राहणार वाघीरा, तालुका पाटोदा (सध्या राहणार देहू गाव, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, रुक्मिणी यांचे पती प्रदिप गोरखनाथ भालेराव (राहणार मेहेर गल्ली, आष्टी) हे नेकपूर येथे मुखबधिर शाळेत शिक्षक आहेत. प्रदिप यांनी पत्नीला कोणतीही माहिती न देता बँकेकडून कर्ज काढून आपली बहीण स्वाती हिला जमीन खरेदीसाठी पैसे दिले होते. या व्यवहाराबाबत रुक्मिणी यांनी पतीला विचारणा केली असता, नणंद स्वाती जालींदर सुरवसे, नंदावा जालींदर उर्फ बाबु सुरवसे (दोन्ही राहणार तांबा राजुरी), नणंद राणी महेश आगलावे (राहणार छत्रपती संभाजीनगर) आणि चुलत मामाचा मुलगा गणेश बप्पासाहेब जिरेकर (राहणार वैजाळा) यांनी रुक्मिणी यांना फोनवरून धमकावून सातत्याने मानसिक त्रास दिला. याच जाचाला कंटाळून रुक्मिणी यांनी टोकाचे पाऊल उचलले ▶ उर्वरित पान २ वर

# अमृत काकाच्या रॅलीतूनच निकाल दिसतोय, हजारो समर्थकांचा उघडपणे पाठिंबा

**पेठ बीड प्रभाग 3 ब मध्ये अमृत काका सारडांची ताकद; रॅलीने विजयाचा शंखनाद**

**बीड । प्रतिनिधी**



पेठ बीड भागातील प्रभाग क्रमांक ३ ब मधून निवडणूक रिंगणात उतरलेले विकासाचे व्हिजन असलेले उमेदवार अमृत काका सारडा यांच्या प्रचारासाठी गुरुवारी (१८ रोजी) दुपारी जबरदस्त जनसमर्थनाची रॅली निघाली. येथील दरग्याला चादर चढवून, महापुरुषांना अभिवादन करत सुरू झालेल्या या रॅलीने संपूर्ण पेठ बीड भागात राजकीय वातावरण तापवले. हजारो समर्थकांनी रॅलीतून अमृत काका सारडा यांना उघडपणे पाठिंबा दिल्याने काकांचा विजय निश्चित झाला असून आता घोषणा बाकी आहे.

पेठ बीड भागात अमृत काका यांच्या प्रचारार्थ रॅली निघणार असल्याची माहित वार्ड क्र. ३ ब मध्ये मिळताच या रॅलीमध्ये युवक, युवती, महिला, ज्येष्ठ नागरिक यांच्यासह चार हजारांहून ▶ उर्वरित पान २ वर

### ● ज्येष्ठ नागरिकांचा अमृत काकांना आर्शिवाद

पेठ बीडच्या रस्त्यांवर गुरुवारी दुपारी अमृत काका सारडा यांच्या प्रचार रॅलीने अक्षरशः उत्साहाची लाट उसळली होती. अमृत काका सारडा जिंदाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. युवकांचा जोश, महिलांचा आत्मविश्वासपूर्ण सहभाग आणि ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती यामुळे रॅलीला वेगळाच भावनिक रंग चढला होता. हातात झेंडे, डोक्यावर टोपी आणि चेहऱ्यावर विजयाचा आत्मविश्वास घेऊन हजारो नागरिक रॅलीत सहभागी झाले होते.

### ● अमृत काका सारडा यांच्याकडे तरुणाईचा विश्वास


अमृत काका सारडा यांच्या प्रचार रॅलीत युवकांचा उत्साह विशेष लक्षवेधी ठरला. हातात झेंडे, चेहऱ्यावर आत्मविश्वास घेऊन शेकडो युवक रॅलीत आघाडीवर होते. बदल हवा, विकास हवा अशा घोषणा देत युवकांनी संपूर्ण पेठ बीड परिसर दणाणून सोडला. मोबाईलमध्ये रील्स काढत, सोशल मिडियावर थेट प्रतिसाद देत युवकांनी अमृत काका सारडा यांना उघड पाठिंबा दर्शविला. युवकांचा हा प्रचंड जोश पाहता, प्रभाग ३ ब मधील मतदारांचा कल स्पष्ट होत असून अमृत काका सारडा यांच्याकडे तरुणाईचा विश्वास भक्कमपणे वळल्याचे चित्र रॅलीतून दिसून आले.






# संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य

भारतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित न राहता पुढील पिढ्यांना दिशा देणारे ठरते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, दारिद्र्य आणि विषमता यांविरुद्ध आपल्या आचरणातून बंड पुकारणारे आणि उपदेशापेक्षा कृतीला अधिक महत्त्व देणारे थोर संत म्हणजे संत गाडगे महाराज होय. २० डिसेंबर रोजी असणार्या त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेताना असे लक्षात येते की गाडगे महाराज हे केवळ कीर्तनकार किंवा संत नव्हते, तर ते एका व्यापक अर्थाने समाजसुधारक, लोकशिक्षक आणि परिवर्तनवादी विचारवंत होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माणुसकी, स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समतेचा संदेश पोहोचवण्यासाठी केला.



गाडगे महाराजांचा जन्म एका अत्यंत साध्या, गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी दारिद्र्य, उपेक्षा आणि सामाजिक विषमतेचे वास्तव जवळून अनुभवले. या अनुभवांनी त्यांच्या मनात समाजाबद्दल करुणा आणि अस्वस्थता निर्माण केली. समाजातील दुःख, अज्ञान आणि अस्वच्छता ही केवळ दैवाची देणगी नसून मानवी निष्काळजीपणा, अज्ञान आणि शोषणाची परिणती आहे, ही जाणीव त्यांना लवकरच झाली. म्हणूनच त्यांनी देव, धर्म आणि अध्यात्म याकडे पाहण्याची पारंपरिक चौकट नाकारून माणूस, समाज आणि नैतिक कर्तव्य यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या मते, देवाची खरी पूजा म्हणजे माणसाची सेवा आणि समाजहिताचे कार्य होय. संत गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या स्वच्छतेच्या विचारात दिसून येतो. स्वच्छता हा केवळ आरोग्याचा विषय नसून तो सामाजिक शिस्तीचा, आत्मसन्मानाचा आणि सभ्यतेचा निर्देशक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. गावोगावी कीर्तनासाठी जात असताना ते सर्वप्रथम हातात झाडू घेऊन रस्ते, चौक, धर्मशाळा आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करत. ही कृती केवळ साफसफाईपुरती मर्यादित नव्हती, तर ती समाजाला दिलेला मौनातील संदेश होता. 'स्वच्छता म्हणजे धर्म' हा विचार त्यांनी शब्दांत नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून रुजवला. लोकांना उपदेश करण्यापेक्षा त्यांनी स्वतः झाडू हातात घेतल्याने समाजमनावर त्याचा खोल परिणाम झाला. स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजाला त्यांनी आरसा दाखवला.

त्यांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन. तत्कालीन समाजात देव-धर्माच्या नावाखाली अनेक गैरप्रथा, कर्मकांड आणि अंधश्रद्धा प्रचलित होत्या. गाडगे महाराजांनी यांना थेट आव्हान दिले. देवळात घंटा वाजवून, नारळ फोडून किंवा महागड्या पूजा करून समाजाचे भले होत नाही, तर शिक्षण, स्वच्छता, आरोग्य आणि मानवसेवा यातूनच समाज उन्नत होतो, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केला. त्यांच्या भाषेत साधेपणा होता, पण आशयात प्रखर सामाजिक जाण होती. त्यामुळे त्यांच्या शब्दांचा प्रभाव ग्रामीण समाजावर विशेषतः मोठ्या प्रमाणात पडला. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची जाणीव गाडगे महाराजांना होती. शिक्षणाविना समाज अज्ञानाच्या अंधारात राहतो आणि शोषणाला बळी पडतो, हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी शिक्षणासाठी निधी उभारण्याचे कार्य सुरू केले. कीर्तनातून मिळालेला पैसा त्यांनी स्वतःसाठी कधीही वापरला नाही. हा पैसा त्यांनी शाळा, वसतिगृहे, धर्मशाळा आणि समाजोपयोगी संस्थांसाठी दिला. विशेषतः गरीब, दलित आणि वंचित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर माणूस म्हणून जगण्याची कला आहे, असा त्यांचा विश्वास होता. गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्यात जातिभेद आणि अस्पृश्यतेविरोधातील लढा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्या काळातील समाज कठोर जातीय विभागणीने ग्रासलेला होता. अस्पृश्यतेमुळे समाजातील मोठा वर्ग मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित होता. गाडगे महाराजांनी या अन्यायाविरुद्ध निर्भीड भूमिका घेतली. त्यांनी आपल्या कीर्तनांतून आणि कृतीतून जातिभेदाचा निषेध केला. सर्व माणसे समान आहेत आणि त्यांचा सन्मान करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या आश्रमांमध्ये आणि धर्मशाळांमध्ये जातपात न पाहता सर्वांना समान वागणूक दिली जात असे. ही कृती त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला थेट आव्हान देणारी होती. दारिद्र्य निर्मूलन आणि गरिबांची सेवा हा गाडगे महाराजांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू होता. गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करते, असे त्यांचे मत होते. त्यामुळे गरिबांना मदत करताना केवळ दानधर्म न करता त्यांना स्वावलंबी बनवण्यावर त्यांनी भर दिला. भुकेल्याला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि संकटात सापडलेल्या माणसाला आधार देणे, हे त्यांना धार्मिक कृत्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या जीवनशैलीतून त्यांनी साधेपणा आणि त्यागाचे उदाहरण घालून दिले. गाडगे महाराजांचे कीर्तन हे केवळ धार्मिक प्रवचन नव्हते, तर ते एक सामाजिक व्यासपीठ होते. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी समाजातील प्रश्न मांडले, अन्यायावर टीका केली आणि परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. त्यांच्या भाषेत ग्रामीण बोलीचा सहजपणा होता, त्यामुळे सामान्य माणसाला ते आपलेसे वाटत. त्यांनी कधीही अवघड तात्त्विक संकल्पना मांडल्या नाहीत, पण साध्या उदाहरणांतून त्यांनी खोल सामाजिक सत्ये उलगडली. त्यामुळे त्यांच्या कीर्तनांना मोठ्या प्रमाणावर लोक उपस्थित राहत आणि त्यांच्या विचारांचा प्रसार होत असे. स्त्री-सन्मान आणि स्त्रियांच्या स्थितीबाबतही गाडगे महाराजांची भूमिका प्रगत होती. त्या काळात स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक सन्मान नाकारला जात होता. गाडगे महाराजांनी स्त्रियांकडे केवळ करुणेने नव्हे, तर समानतेच्या दृष्टीने पाहिले. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे आणि तिच्या उन्नतीशिवाय समाजाचा विकास शक्य नाही, असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी स्त्रीशिक्षणाला पाठिंबा दिला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. संत गाडगे महाराजांच्या कार्यात धर्माची व्याख्या अत्यंत मानवी स्वरूपाची होती. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मंदिर, मशीद किंवा चर्चपुरता मर्यादित नसून तो माणसाच्या आचरणात दिसून यायला हवा. स्वच्छता, प्रामाणिकपणा, करुणा, समानता आणि सेवाभाव हेच खरे धार्मिक मूल्ये आहेत. त्यांनी कर्मकांड, दिखावा आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली चालणाऱ्या शोषणाचा तीव्र निषेध केला. त्यामुळे काही वेळा त्यांना विरोधालाही सामोरे जावे लागले, पण त्यांनी कधीही आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.

गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा प्रभाव त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही. त्यांच्या विचारांनी पुढील अनेक समाजसुधारक, कार्यकर्ते आणि चळवळींना प्रेरणा दिली. स्वच्छतेचा संदेश, शिक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धेविरोधी भूमिका आणि सामाजिक समतेचा आग्रह हे सर्व विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. आजच्या काळातही समाज अस्वच्छता, अंधश्रद्धा, विषमता आणि नैतिक अधःपतन अशा समस्यांनी ग्रासलेला आहे. अशा परिस्थितीत गाडगे महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. समकालीन समाजात गाडगे महाराजांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. स्वच्छ भारत अभियान, सामाजिक समता, शिक्षण सर्वांसाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या उपक्रमांना गाडगे महाराजांच्या विचारांची वैचारिक बैठक लाभू शकते. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे केवळ सरकारी योजना किंवा कायदे नव्हेत, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या आचरणातून समाजहित साधण्याचा मार्ग आहे. हातात झाडू घेऊन स्वच्छता करणे, गरजूला मदत करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि अंधश्रद्धेला प्रश्न विचारणे हीच गाडगे महाराजांना खरी श्रद्धांजली ठरू शकते. संत गाडगे महाराजांच्या जीवनाकडे पाहिले तर असे लक्षात येते की त्यांनी कधीही प्रसिद्धी, सत्ता किंवा संपत्तीचा पाठलाग केला नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य सेवाभाव, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला उपदेश केला नाही, तर स्वतः उदाहरण घालून दिले. म्हणूनच ते केवळ संत नव्हते, तर ते एक जिवंत सामाजिक चळवळ होते. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा स्मरण करताना आपल्यालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, आपण समाजासाठी काय करत आहोत, हा प्रश्न स्वतःला विचारण्याची हीच योग्य वेळ आहे. अशा या थोर समाजसुधारकाच्या स्मृतीला वंदन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की संत गाडगे महाराजांचे विचार हे काळाच्या पुढे जाणारे होते. त्यांनी दाखवलेला मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा मार्ग आजही तितकाच प्रकाशमान आहे. समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेतली, तर खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडू शकेल. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ भूतकाळाची उजळणी नव्हे, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्याची प्रेरणा घेणे होय.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

## तरुणाईच्या तोंडी 'शिव्यां'च्या माळा !

साधारण २०- २५ वर्षांपूर्वी रेल्वेतील पुरुषांच्या डब्यातून, बसमधून प्रवास करताना कोणाची भांडणे झाली आणि त्यापैकी कोणी घाणेरड्या शिव्या देऊ लागले कि प्रवाशांपैकी कोणीतरी पुढाकार घेऊन पटकन त्यांना सूचित करायचा कि आजूबाजूला महिला, लहान मुले आहेत, याचे भान ठेवा. त्याबरोबर भांडण जरी थांबले नाही, तरी एकमेकांना शिव्या द्यायचा कार्यक्रम मात्र पटकन थांबवला जायचा. आपल्या संस्कारांचे महिला आणि लहान मुलांसमोर जाहीर प्रदर्शन नको म्हणून शिव्यांना लगाम घातला जायचा. चाळी-वसाहतींमध्ये सुद्धा भांडण झाले, तरी मुखातून घाणेरड्या शिव्या येणार नाहीत, याचे भान बऱ्याच प्रमाणात राखले जात असे. आपली मुले हे सर्व ऐकतील आणि उद्या तेही अशाच शिव्या बरळतील याची जाणीव पालकांना असायची. शाळा महाविद्यालयांमध्ये सुद्धा थट्टा-मस्करीमध्ये मुखातून शिव्या येणार नाहीत, याचे भान विद्यार्थ्यांकडून राखले जात असे. शिव्या दिल्या कि आपल्यातील असभ्यपणा चव्हाट्यावर येतो याची कुठेतरी जाणीव त्या काळातील पिढीला असायची. आता मात्र काळ पूर्णतः बदलला आहे. प्रवासात, बाजारात किंवा गर्दीच्या ठिकाणी एकमेकांशी सहज बोलतानाही तरुण मंडळींकडून घाणेरड्या शिव्यांचा आणि अश्लील शब्दांचा सर्रासपणे वापर केला जातो. शिव्या किंवा अपशब्दांचा वापर केल्याशिवाय बऱ्याचदा यांचे वाक्यच पूर्ण होत नाही. तरुण मित्र मंडळींमध्ये एकमेकांना हाक मारतानासुद्धा समोरच्याच्या नावापेक्षा बऱ्याचदा एखाद्या शिवीनेच त्याचा उद्धार केला जातो. शेजारी पाजारी महिला किंवा लहान मुले आहेत, याचा तिळमात्र विचार केला जात नाही. त्यामुळे एकमेकांना शिव्या देण्यासाठी भांडणेच व्हायला हवीत असे काही गरजेचे नाही. नेहमीच्या संभाषणात सुद्धा शिव्यांच्या माळा गुंफल्या जातात. कालपरत्वे मुलामुलींमधील दरी कमी झाल्याने तरुणवर्गाच्या गटामध्ये मुली सुद्धा सामावलेल्या असतात. त्या सोबत असल्या, तरी मुलांच्या संभाषणात शिव्या काही टाळल्या जात नाहीत. आजमितीला बहुतेक सर्वच ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर प्रौढांसाठी 'विशेष' वेब सिरीज तयार केल्या जातात. या वेब सिरीजमध्ये पदोपदी शिव्यांचा मारा केलेला असतो. यांतील स्त्री पात्रांसमोरही शिव्या आणि अश्लील शब्दांचा वापर केलेला असतो. काहीवेळा यांतील स्त्री पात्रांच्या तोंडीही शिव्या दिल्या जातात. दुर्दैवाने यातून मराठी वेब सिरीजही सुटलेल्या नाहीत. समाजातील वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन शिक्षण विभागाने शाळांतून नीती आणि नैतिक मूल्याचे शिक्षण अनिवार्य केले आहे; मात्र अनेक शाळांमध्ये या विषयासाठी शिक्षकच देण्यात आलेले नाहीत त्यामुळे या विषयाच्या तासिकेमध्ये वेगळेच काहीतरी शिकवले जाते. समाजाची ढासळती नीतिमत्ता लक्षात घेता भावी पिढीमध्ये संस्कारांचे बीज रोवणे आणि ते वाढवणे आज अनिवार्य झाले आहे. यासाठी अन्य गोष्टींना दोष देण्याऐवजी पालकांनीच आपल्या पाल्याचे संपूर्ण दायित्व घ्यायला हवे. -जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

◆ पान ४ वरून पुढे...

## राज्यातील २३....

देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा या ठिकाणी मतदान पार पडणार आहे. त्याचबरोबर पुण्यातील बारामती, फुरसुंगी-उरुळी देवाची, सोलापूरातील अनगर, मंगळवेढा, साताऱ्यातील महाबळेश्वर, फलटण येथेही मतदान पार पडणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री, नांदेडमधील मुखेड, धर्माबाद, लातूरमधील निलंगा, रेणापूर, हिंगोलीतील वसमत, अमरावतीतील अंजनगावसूर्जी, अकोला जिल्हातील बाळापूर, यवतमाळमधील यवतमाळ, वाशिममधील वाशिम, बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगावराजा, वर्ध्यातील देवळी आणि चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस येथे मतदान पार पडणार आहे.

## जवळगाव शिवारात...

आणि बरगड्यांना झालेल्या गंभीर दुखापतीमुळे या तरुणाचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवला असून मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. हा तपास बर्दापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शंकरराव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

## संतोष देशमुख...

असल्याचा दावा करत त्यांना या खटल्यातून बाजूला करावे, असा अर्ज आरोपींनी न्यायालयात सादर केला. यावर निकम यांनी प्रत्युत्तर देताना सांगितले की, अशा अर्जाला कोणताही कायदेशीर आधार नाही. याच सुनावणी दरम्यान आरोपी क्रमांक २ विष्णू चाटे याच्या जामीन अर्जावरही चर्चा झाली. चाटे याचे नाव सुरुवातीच्या तक्रारीत नसल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाने केला, तर तो सुरुवातीपासूनच गुन्ह्यात सक्रिय असून त्याने आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे खंडणी मागितली होती, असा प्रतिदावा सरकारी पक्षाने केला. सुनावणी सुरू असतानाच जेव्हा न्यायाधीशानी आरोपी सुदर्शन घुले याचे नाव पुकारले, तेव्हा तो अचानक न्यायालयात चक्कर येऊन पडल्याने काही काळ गोंधळ उडाला होता. पुराव्यांच्या तांत्रिक मुद्द्यांवरूनही बचाव पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला. घटनेचे व्हिडिओ उच्च न्यायालयात दाखवले जातात, मात्र ते अद्याप आरोपींना पुरवण्यात आलेले नाहीत, असा आक्षेप घेण्यात आला. बीएनएसएस च्या कलम २३० नुसार पुराव्यांची पूर्तता झाल्याशिवाय दोषारोप निश्चिती करू नये, ही मागणी न्यायालयाने ग्राह्य धरली. तपास अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, मोबाईलमधील डेटा लॅपटॉपमध्ये कॉपी करून मूळ डेटा हटवण्यात आला आहे, ज्याचा तांत्रिक अहवाल येण्यास वेळ लागणार आहे. या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी न्यायालयाने आता २३ डिसेंबर ही तारीख निश्चित केली आहे.

## पालवन चौकात...

वेश्या व्यवसाय करीत आहेत. सदर माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून झख कस्तुरे व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख PSI पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह तसेच डमी ग्राहक व पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या पुरुष एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १००० रुपयांची मागणी केली व डमी ग्राहकास वरच्या मजल्याच्या रूम मधे जायला सांगितले. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी जावून छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या पुरुषास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव अशोक ज्ञानोबा गदळे वय ६१ वर्षे रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड असे सांगितले. सदर पुरुषाची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या २ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी एक पीडित महिला मिळून आली. पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता , तिने सांगितले की, अशोक ज्ञानोबा गदळे आणि आशा सुंदर पवार वय ४५ वर्षे रा. पालवण रोड पालवण चौक जवळ जि. बीड हे दोघे महिलांना घरी बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. आरोपी अशोक गदळेची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, त्याच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या २ नोटा मिळून आल्या. तसेच रुमची झडती घेतली असता १२ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. दोन्ही नमुद आरोपींवर पीडीत महिलेस स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलेचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ व कलम ३(५) भा. न्या. संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे प्रभारी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय , पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , महिला फौजदार मीरा रेडेकर, महीला पोलीस हवालदार उषा चौरे, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई योगेश निर्धार सर्व नेमणूक अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

## परळीत SBI...

चोरीच्या घटना वाढत असल्याने चोरट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## सासरच्या जाचाला...

असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम १०८ आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नामदेव यादवराव धनवडे करत आहेत.

## अमृत काकाच्या...

अधिक नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान नागरिकांचा उत्साह, युवकांचा सहभाग आणि मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहता अमृत काका सारडा यांचा विजय निश्चित मानला जात आहे. विकासकामांचा ठोस अनुभव, लोकांशी असलेली थेट नाळ आणि सर्वसामान्यांमध्ये असलेली विश्वासार्ह प्रतिमा यामुळे पेठ बीडमधील मतदारांनी उघडपणे पाठिंबा दर्शविल्याचे या रॅलीतून स्पष्ट झाले. ही रॅली केवळ प्रचाराचा भाग न राहता, प्रभाग ३ ब मधील जनतेने दिलेला कौल असल्याची भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे. या रॅलीमध्ये भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, ज्योतीताई घुमरे, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, सलीम जहांगीर, अनिल चांदणे, विक्रांत हजारी, ढोरमारे, अशोक लांडे, विलास मोमीन, बिभीषण लांडगे, गणेश वाघमारे, विकास जोगदंड, अविनाश जोगदंड, संतोष नलावडे, ईश्वर धनवे, महेश कसबे, सचिन गालफाडे, कैलास चांदणे, गणेश लोंढे शेख चांद सोनू मुजमुले, लक्ष्मण शेनकुडे, विलास बामणे, मोहन राऊत, रमेश घोडके, बबलू गिलडा, विष्णू बियानी ,राजेश चरखा, द्वारका मुंदडा, सुशील खटोड, मदन दुगड, शेटे, बंटी परळकर, विष्णू पवार, शत्रुघ्न पटेल, यांच्यासह हजारोच्या संख्येने कार्यकर्ते तरूण, मतदार महिला बंधू भगिनी सहभागी झाले होते. विठ्ठल मंदिर चौक परिसरातून रॅलीला सुरुवात झाली, काळा हनुमान ठाणा येथे आल्यानंतर रॅलीचा समारोप झाला.

◆ पान ४ वरून पुढे...

## महावितरणचा 'वाढदिवस'...

करणाऱ्या या कार्यालयात कंत्राटदारांसाठी मात्र रेड कार्पेट का? असा थेट सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला असून, या गर्दीमागे केवळ शुभेच्छा नसून संशयास्पद आर्थिक हितसंबंध दडले असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्र्यांकडे तक्रार; कारवाईचा इशारा- या बेजबाबदार व नियमबाह्य प्रकाराची गंभीर दखल घेत डॉ. गणेश ढवळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व विभागीय आयुक्तांकडे पुराव्यासह लेखी तक्रार दाखल केली आहे.

## आष्टी ग्रामीण...

संबंधित रुग्णालयाच्या आरोग्य सेवा अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. डॉ. मोराळे यांनी यापूर्वी कोव्हिड काळात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले असून, त्यांची पदोन्नती झाल्याने त्यांची जामखेड येथे वैद्यकीय अधिक्षक म्हणून निवड झाल्याने त्यांनी दिड वर्षांपासून काम पाहत होते. यासह विविध शासकीय आरोग्य संस्थांमध्ये कार्य करताना रुग्णसेवा, प्रशासन व आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. रुग्णहिताला प्राधान्य देणारी कार्यपद्धती, शिस्तबद्ध प्रशासन आणि कर्मचाऱ्यांशी समन्वय राखून काम करण्याची त्यांची ओळख आहे. नियुक्तीनंतर बोलताना डॉ. मोराळे यांनी रुग्णांना वेळेत व दर्जेदार उपचार मिळावेत, तसेच रुग्णालयातील सुविधा अधिक बळकट करण्यावर भर देणार असल्याचे सांगितले. त्यांच्या नियुक्तीबद्दल रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी समाधान व्यक्त करत शुभेच्छा दिल्या आहेत.

## आंदोलनाचा इशारा...

ग्रामसेवक यांच्या अहवालानुसार लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम केलेले आहे. सदरील लाभार्थ्यांच्या खात्यावरील होल्ड काढून लाभ धारकास सदर रक्कम काढण्यासाठी परवानगी देण्यात यावी. येत्या आठ दिवसाच्या आत सदरील रक्कम संबंधितांच्या खात्यावर नावे करण्यात यावी. अन्यथा आपल्या बँकेला पुढील बुधवार दिनांक २४ /१२ /२०२५ रोजी टाळा ठोकू आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला होता.या मागणी ची तातडीने दखल घेऊन या शाखेचे व्यवस्थापक यांनी सदर करण्यात आलेली मागणी मान्य केली असल्याने आपण टाळे ठोको आंदोलन मागे घेत असल्याचे भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले.

## कर्तव्यावर बजावताना...

भेट देऊन शोकसंवेदना व्यक्त केल्या. सुदाम पोकळे हे यापूर्वी अंभोरा पोलीस स्टेशन येथे अनेक वर्षे कार्यरत होते. काही दिवसांपूर्वीच त्यांची कर्जत पोलीस स्टेशन येथे बदली झाली होती. नव्या ठिकाणी कर्तव्य बजावत असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२.३० वाजता चिंचाळा येथील त्यांच्या शेतात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलिस दलाच्या वतीने हवेत फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. अंत्यसंस्काराला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह पोलिस खात्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात वडील, आई, भाऊ, पत्नी व मुलगी असा मोठा परिवार आहे. कर्तव्यावर असताना प्राण गमावलेल्या सुदाम पोकळे यांना पोलीस खात्यासह संपूर्ण परिसरातून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे असह्य दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## भाववाढीच्या "शेतकरी...

माजी सरपंच कृष्णा पितळे, पांडुरंग कानडे ,बंडु चेअरमन,भास्कर ढास, ऋषिकेश ढास, कृष्णा ढास, सुरज ढास, गहिनीनाथ ढास, विक्रम रंधवे, बाळासाहेब ढास, गोवर्धन ढास, भागवत कदम, दिलीप ढास, शिवाजी ढास , संदिपान ढास, लिंबाजी ढास,उत्तरेश्वर ढास,बाळु कोटुळे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तलवाडा येथील...

करण्यासाठी अर्ज करण्यात आला आहे का? त्यांना ग्रामपंचायत ने बांधकाम परवाना दिला आहे का? दिला असेल तर त्याला बैठकी मध्ये परवानगी घेण्यात आली आहे का? याची बौकशी करून सदरील बांधकाम तात्काळ थांबवण्याची कार्यवाही करावी व केलेले बांधकाम काढण्यात यावे असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे यावेळी शेख खिजर जैनोदीन, जयदेव शिंगने, बाळू डहाळे, पत्रकार विष्णू राठोड हे उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पारदर्शक प्रशासनासाठी दस्तऐवजावर क्यू आर कोड आणि युनिक आयडी, जिल्हा प्रशासनाचा अभिनव उपक्रम

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासनाने सुशासन सप्ताह अभियानांतर्गत विकसित केलेली दस्तऐवज पडताळणी (Document Verification) सुविधा ही एक सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित प्रणाली आहे. हा उपक्रम जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर दिलीप स्वामी यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला आहे.

या प्रणालीमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी User ID d Password आधारित सुरक्षित लॉगिनची सुविधा उपलब्ध आहे. संबंधित शासकीय अधिकारी लॉगिन करून निर्गमित होणाऱ्या दस्तऐवजांना युनिक आयडी (Unique ID) व QR कोड मॅप करतात. हा युनिक आयडी व ट्ठ कोड त्या दस्तऐवजाची ओळख व सत्यता सुनिश्चित करतो.

नागरिक तसेच इतर शासकीय कार्यालये https://verify.dmcsn.com/ या पोर्टलवर दस्तऐवजावरील QR कोड स्कॅन करून किंवा युनिक आयडी प्रविष्ट करून संबंधित दस्तऐवजाची त्वरित पडताळणी करू शकतात. यामुळे तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातून निर्गमित होणाऱ्या विविध आदेश, प्रमाणपत्रे व इतर शासकीय दस्तऐवजांची खात्रीशीर तपासणी सुलभ होते.

ही सुविधा नागरिक व शासकीय कार्यालयांना वेळेत व अचूक दस्तऐवज पडताळणी करण्यास मदत करते. बनावट, फेरफार केलेले किंवा संपादित (Editable) दस्तऐवज ओळखून त्यापासून होणारे गैरप्रकार, फसवणूक व पुढील कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरत असून, प्रशासनातील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. जिल्हा प्रशासन अंतर्गत होणाऱ्या महसूल आणि इतर विभागाअंतर्गत होणारा पत्रव्यवहार तसेच यातून विविध कागदपत्रे प्रमाणपत्रे नागरिकांना वितरित केले जातात हे वितरित करत असताना त्याचे प्रमाणिकीकरण ओळखण्यासाठी क्यू आर कोड द्वारे वेगळी ओळख कायमस्वरूपी देण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना हे कागदपत्र कोठेही आणि कधीही संबंधित कागदपत्राचा क्यू आर कोड स्कॅन करून पाहता येणार आहे.

ही सुविधा निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आली असून, याचे डिझाइन व विकास प्रकल्प व्यवस्थापक, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी केले आहे.

## माजी सैनिकांसाठी लिपिक–टंकलेखक साठी पदभरती

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक–टंकलेखक (गट–क) या पदांच्या भरतीसाठी एकूण ७२ पदांसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेल्या माजी सैनिकांसह, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार युद्धकाळात किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन सेवेस अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एक पात्र व्यक्तीस, पसंतीक्रमानुसार निवड करण्यात येणार आहे. ७२ पदांपैकी ३ पदे किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव असून, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा विचार करून गुणवत्ता व उपलब्धतेनुसार भरती करण्यात येणार आहे. भरती प्रक्रिया टीसीएस–आयओएन (TCS-ION) यांच्या मार्फत राबविण्यात येणार असून, परीक्षेसाठी अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पात्र उमेदवारांनी वेब–आधारित ऑनलाईन अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## माळेगाव यात्रेतील पशुप्रदर्शन स्पर्धेत शेतकरी विनायक थोरात यांच्या देवणी वळूंनी मारली बाजी

**नांदेड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील माळेगाव यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पशुप्रदर्शन स्पर्धेत मराठवाड्याचे भूषण मानल्या जाणाऱ्या देवणी जातीच्या वळूंनी बाजी मारली आहे . लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील उजळंब येथील शेतकरी विनायक श्रीमंतराव थोरात यांच्या देवणी जातीच्या वळूंनी या स्पर्धेत बाजी मारली.या स्पर्धेत एक वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक तसेच एक वर्षावरील गटात द्वितीय क्रमांक असे दोन्ही पारितोषिके विनायक थोरात यांच्या देवणी जातीच्या वळूंनी पटकावून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. देवणी जातीची वैशिष्ट्ये, उत्तम बांधा, चांगले आरोग्य व शुद्ध वंश या गुणांच्या आधारे परीक्षकांनी या वळूंना विशेष गुण दिले. या यशामुळे देवणी जातीच्या गोवंश संवर्धनाला चालना मिळाली असून परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. माळेगाव यात्रेतील या पशुप्रदर्शन स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील देशी गोवंशाच्या जतन व संवर्धनाला नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.या यशाबद्दल शेतकरी विनायक श्रीमंतराव थोरात यांनी यासाठी घेतलेल्या मेहनतीसाठी त्यांचे पशुपालक, ग्रामस्थ तसेच शेतकरी बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. मालेगाव यात्रा ही नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात खंडोबा देवाची मोठी यात्रा असते जी दरवर्षी मार्गशीर्ष वद्य चतुर्दशीला भरते आणि दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून ओळखली जाते.

वळूची काळजी लहान मुलांप्रमाणे घ्यावी लागते. दररोज दोन वेळा शेंगदाण्याची पेंड भिजवून द्यावी लागते. तसेच मका, ज्वारी–बाजरीचा भरडा, पौष्टिक खुराक आणि हिरवा चारा खाऊ घालावा लागतो. रोज सकाळी व संध्याकाळी योग्य असा व्यायाम करून घ्यावा लागतो आणि स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी लागते. दररोज शाम्पू व साबणाने नीट स्वच्छ करून घ्यावे लागते.– शेतकरी विनायक श्रीमंतराव थोरात

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि.२५ डिसेंबर रोजी ख्रिसमस, ३१ डिसेंबर वर्षाचा शेवटचा दिवस आणि १ जानेवारी नुतन वर्ष स्वागत व भिमा कोरेगाव शौर्य दिवस या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १ जानेवारी २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही,

## जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा

**परभणी । प्रतिनिधी**



जिल्हाधिकारी कार्यालयात आज अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला. अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक यांच्यात परस्पर सलोखा व सदभाव कायम ठेवणे महत्त्वाचे असून लोककल्याणकारी दृष्टिकोनातून सर्वांनी यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. त्या अनुषंगाने दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. अल्पसंख्यांक समाजाला त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची माहिती मिळावी, यासाठी अल्पसंख्यांक विकास विभाग, जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात अल्पसंख्यांक दिन आज साजरा करण्यात आला.

जिल्हाधिकारी म्हणाले की, भारतात विविधतेत एकता आहे. राज्यघटनेतील कलम २९ व ३० अंतर्गत अल्पसंख्यांकांसाठी महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन अनेक उपक्रम राबविते. कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) अनिता भालेराव, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश वाघमारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी उमाकांत लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भोसले तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समितीचे अधिकारी–कर्मचारी, शिक्षक, मार्गदर्शक व अल्पसंख्यांक समाजातील नागरिक उपस्थित होते.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाकडून वस्तुस्थितीचा खुलासा

**नांदेड । प्रतिनिधी**

अलीकडच्या कालावधीत समाजमाध्यमांद्वारे तसेच काही व्यक्तींमार्फत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कार्यवाहीबाबत अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या चुकीच्या माहितीतून महामंडळाची बदनामी होत असून मराठा समाजासह सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

राज्य शासनामार्फत विविध शासकीय विभाग, महामंडळे व शासन अंगीकृत उपक्रमांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद निश्चित केली जाते. विधिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी होत असून, त्याअंतर्गत प्रत्येक विभाग व महामंडळास वार्षिक इष्टांक (Targets) निश्चित करणे बंधनकारक असते. राज्यातील इतर आर्थिक विकास महामंडळांप्रमाणेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फतही वार्षिक इष्टांक निश्चितीची कार्यवाही करण्यात येते. त्या इष्टांकाच्या मर्यादेतच वित्तीय दायित्व निर्माण करणे नियमानुसार आवश्यक आहे. सध्या राज्यात महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या असून काही नगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

निवडणूक कालावधीत राज्य निवडणूक आयोगामार्फत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून तिचे पालन सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व शासन अंगीकृत उपक्रमांवर बंधनकारक आहे. आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने केवळ महानगरपालिका क्षेत्र तसेच निवडणुका प्रलंबित असलेल्या नगरपालिका व नगरपरिषदांच्या हद्दीत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत नवीन पात्रता प्रमाणपत्र (LOI) देण्याची कार्यवाही तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त राज्यातील इतर भागात पात्रता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया नियमितपणे सुरू असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले आहे. आदर्श आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर व निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधित क्षेत्रांमध्ये पात्रता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही नियमानुसार पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे महामंडळाबाबत पसरवण्यात येत असलेल्या अफवा अथवा चुकीच्या माहितीवर मराठा बांधवांनी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## साखर शाळा सुरु करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील सागर कारखाना परिसरातील ऊसतोड मजूर कामगारांच्या छावणीमध्ये गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. व्ही. कड यांच्या मार्गदर्शनानूसार कायदेविषयक माहिती, बालकांचे अधिकार, बाल विवाह, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, महिला हेल्पलाईन आणि शाळा बाह्य विद्यार्थ्यांना साखर शाळा सुरु करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला.

जिल्हा महिला व बालविकास विभाग जालना आणि शिक्षण विभाग घनसावंगी यांच्या संयुक्त पथकाने पालक, बालकांना मार्गदर्शन केले. महिला व बाल विकास विभाग जालना कार्यालयातील जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, संतोष दाभाडे, ने उपस्थिती होती.

## जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्थांना अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील पाथरी, सेलू, पूर्णा, गंगाखेड, परभणी व जिंतूर येथील अल्पसंख्याक मुलींसाठी असलेल्या शासकीय वसतीगृहांमध्ये शिपाई, सफाईगार व पहारेकरी अशी पदे सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांमार्फत भरण्यात येणार आहेत. ही पदे कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी असून, एकूण ४२ पदे भरावयाची आहेत.

सदर कामे जिल्ह्यातील पात्र सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना स्वावलंबी होण्यासाठी कामवाटप समितीमार्फत देण्यात येणार आहेत. यासाठी ऑगस्ट २००० नंतर स्थापन झालेल्या व सहकार कायदा १९६० अन्वये नोंदणीकृत असलेल्या सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांनाच अर्ज करता येणार आहे. संबंधित संस्था किमान सहा महिने कार्यरत असणे आवश्यक असून, काम देणाऱ्या विभागातील अटी व शर्ती मान्य करणे बंधनकारक राहील. अशा पात्र सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजीपर्यंत सादर करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त प्र. सो. खदारे यांनी केले आहे.

दैनिक मराठवाडा पत्र  दि. २०/१२/२०२५

**CHANGE IN NAME**

I Declaration by this Publication about change in my name
**Old name: Rekha Laxman Choudhari**
**New name: Rekha Laxmanrao Choudhari**
Present address: Shinde nagar, Canol road. Beed.
Dist. Beed. Maharashtra. Mob.no 9860667037

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क .स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १८६५/२०२५

१.सौ. उषा भ्र. सुरेश पंडीत, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकपुरा, बीड, ता.जि. बीड. २. सौ. आशा भ्र. प्रकाश अतकरे, वय ६८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. पिंपळवाडी, ता. जि. बीड. ३.सौ. कविता भ्र. राजेंद्र रावताळे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोणी वारणी ता. शिरुर कासार, जि.बीड, सौ. सविता भ्र. सुरेश पंडीत, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकपुरा, बीड, ता.जि.बीड, ५.सौ. मिरा भ्र. नाना रावताळे, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाळवंडी नाका, बीड, ता.जि.बीड, ६.सिताबाई अनिल राउत, वय सज्ञान वर्षे, धंदा – घरकाम,रा. डोंगरकिन्ही, ता. पाटोदा, जि.बीड,

विरुध्द   निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे साहेबराव भाउ काळे हे / हया दिनांक १६/०१/२०१५ रोजी राहते घरी पिंपळवाडी ता.जि.बीड येथे व मयत नामे सुंदराबाई साहेबराव काळे हया दिनांक ०९/०४/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– १५/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख: २३/०१/२०२६
( मार्फत विधिज्ञ:– ॲड डी डी मस्के )

शिक्का   (स्वाक्षरीत) क. लिपीक   आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहिर प्रगटन

**मा.श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८७०/ २०२५
अरुणाबाई वि. निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार:१) अरुणाबाई भ्र. रघुनाथ कांबळे, वय: ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळनेर, ता. जि. बीड, २) रामेश्वर पि. रघुनाथ कांबळे, वय: ५३ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ३) परमेश्वर पि. रघुनाथ कांबळे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ४) मंगल भ्र. दशरथ घेणे, वय: ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे

विरुध्द   निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे रघुनाथ बापुराव कांबळे, राहणार पिंपळनेर, ता. जि. बीड हे दिनांक १३/०८/२०२५ रोजी राहत्या घरी पिंपळनेर ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ हया मयतांची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हे मयतांचे मुले आहेत तर अर्जदार क. ४ ही मयताची मुलगी आहे.

मयत नामे रघुनाथ बापुराव कांबळे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सदरहु सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत रघुनाथ बापुराव कांबळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०१/२०२६ आहे.

आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
( विधीज्ञ श्री. गणेश घुगे)

शिक्का   (स्वाक्षरीत) क. लिपीक   आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज १९०६/२०२५
विमल लक्ष्मण खरात व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :– १. विमल प्र. लक्ष्मण खरात, वय – ६८ वर्षे, धंदा–घरकाम, रा. हिवरपहाडी, ता. जि. बीड, २. भागवत पि. लक्ष्मण खरात, वय – ३६ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर, ३. दत्तात्रय पि. लक्ष्मण खरात, वय – ३२ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर ४. नारायण पि. लक्ष्मण खरात, वय–२७ वर्षे, धंदा– घरकाम, रा. सदर

गैरअर्जदार :– निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लक्ष्मण नारायण खरात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत लक्ष्मण नारायण खरात यांचा मृत्यु दिनांक ३१.०८.२०२५ रोजी राहते घरी हिवरापहाडी ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ ते ४ हे त्यांचे मुले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार मदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लक्ष्मण नारायण खरात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ४ फेब्रुवारी २०२६
(ॲड. जी एस घुगे यांच्यामार्फत)

शिक्का   (स्वाक्षरीत) क. लिपीक   आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. व्ही.जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९४६/२०२५
आश्रुबा पि. बप्पासाहेब तावरे व इतर वि. निरंक

अर्जदार–१. आश्रुबा पि. बप्पासाहेब तावरे, वय – ६१ वर्षे, धंदा–व्यापार, रा. स्वराज्य नगर, दक्षिण बाजु, बलगुजार, बीड ता.जि.बीड, २. मेघा भ्र. हनुमंत तावरे, वय– ४५ वर्षे, धंदा – घरकाम रा. खडकी घाट ता. जि. बीड, ३.आशिष पि. हनुमंत तावरे, वय– २६ वर्षे, धंदा–खाजगी नौकरी, रा. विद्यानगर (पूर्व), सहयाद्री हॉटेलच्या जवळ, बीड ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

प्रकरण: भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत कलावती भ्र. बप्पा तावरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत कलावती भ्र. बप्पा तावरे हया दिनांक १०/०९/२०२५ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही मयताची सुन तर ममताची सुन तर अर्जदार क्र. ३ हा मयताचा नातु आहे. मयताचे पती बप्पा बाबु तावरे हे दिनांक ०४.०५.२०२० रोजी मयत झालेले आहेत. मयतास अजुन एक मुलगा नामे हनुमंत बप्पासाहेब तावरे हा होता, तो दिनांक २१.०५.२०१५ रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र. २ ही त्याची पत्नी असुन अर्जदार क्र. ३ हा मुलगा आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे कलावती भ्र. बप्पा तावरे रा.बीड ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख १३ /०२/२०२६.

आज दिनांक १९/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
(ॲड. ए. व्ही. मेहेत्रे यांच्यामार्फत )

शिक्का   (स्वाक्षरीत) क. लिपीक   आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ • पान ४

## थोडक्यात

### आज आणि उद्याचे आठवडी बाजार बंद



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील (बीड,अंबाजोगाई,परळी वैद्यानाथ,किल्ले धारुर) या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने दिनांक २० डिसेंबर २०२५ शनिवार रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. २९.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये न्यायालयीन अपील दाखल झालेल्या सदस्य पदाच्या जागेवरील निवडणूक स्थगित करुन संबंधित नगर परिषद नगर परिषदामधील सार्वत्रिक निवडणूकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम २०२५ जाहिर करण्यात आलेल्या आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार शनिवार २० डिसेंबर २०२५शनिवार रोजी मतदान व २१ डिसेंबर २०२५ रविवार रोजी मतमोजणी निवडणूक प्रक्रिया पार पडणार असल्याने संबंधीत जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी या कार्यालयास दिनांक २०.१२.२०२५ शनिवार रोजी भरत असलेल्या आठवडी बाजारांची माहिती या कार्यालयास सादर केली आहे. जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिनांक २० डिसेंबर २०२५ शनिवार रोजी बीड जिल्हयातील (बीड, परळी, अंबाजोगाई किल्ले धारुर,) दि. २० डिसेंबर २०२५ मतदानाच्या दिवशी व २१ डिसेंबर २०२५ रविवार मतमोजणीच्या दिवशी भरणा–या आठवडी बाजार निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगरपालिका क्षेत्रातील आठवडी बाजार बंद ठेवणे अथवा पुढे ढकलण्यास हरकत नसलेवावत नमूद केले आहे. दिनांक २० डिसेंबर २०२५ शनिवार रोजी मतदानाच्या दिवशी व रविवार दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणीच्या दिवशी खाली नमूद ठिकाणी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. बीड येथे दि.२१ डिसेंबर २०२५ रविवार मत मोजणीच्या दिवशी भरणाऱ्या आठवडी बाजाराचे ठिकाण बाजारतळ डॉ. आंबेडकर चौक बीड तसेच माजलगाव शासकीय विश्रामगृह रोड व गढी रोड माजलगाव नगर परिषद क्षेत्रात भरणारे बाजार मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी बीड जिल्ह्यातील वरील ठिकाणी भरविण्यात येणारे आठवडी बाजार बंद ठेवून दि. २२ डिसेंबर २०२५ सोमवार या दिवशी भरविण्यात यावेत असे प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

### संपादक बालासाहेब फपाळ यांचे मायेचे छत्र हरपले



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील बेलोरा येथील मूळ रहिवासी व सध्या तेलगाव येथे वास्तव्यास असलेले साप्ताहिक जन्सामान्याचा विकासनामा या वृत्तपत्राचे संपादक मा. बालासाहेब दामोधर फपाळ यांच्या मातोश्री मंदिराबाई दामोधर फपाळ (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने फपाळ कुटुंबावर शोककळा पसरली असून संपादक बालासाहेब फपाळ यांचे मायेचे छत्र हरपले आहे. मंदिराबाई फपाळ या स्वभावाने अतिशय शांत, मनमिळावू, कष्टाळू आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. कुटुंबातील प्रत्येक सदस्यासाठी त्या आधारस्तंभ होत्या. कुटुंब, नातेसंबंध आणि समाज यांना एकत्र बांधून ठेवणारी त्यांची भूमिका सर्वश्रुत होती. त्यांच्या संस्कारामुळेच फपाळ कुटुंबात मूल्याधिष्ठित विचार, सेवाभाव आणि सामाजिक जाणिवा रुजल्या असल्याचे कुटुंबीय व आप्तस्वकीय आवर्जून सांगतात. संपादक बालासाहेब फपाळ यांनी आपल्या मातोश्रींची सेवा अत्यंत प्रेमाने व जबाबदारीने केली. त्यांच्या आजारपणातही त्यांनी कोणतीही कमी पडू दिली नाही. आई–मुलातील जिव्हाळ्याचे नाते परिसरात परिचित होते. मात्र काळाच्या नियमानुसार मंदिराबाई फपाळ यांचे निधन झाले आणि बालासाहेब फपाळ यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. त्यांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, ग्रामस्थ व नातेवाईकांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. मंदिराबाई फपाळ यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने कुटुंबात निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी व अंत्यविधीसाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. दरम्यान, माती सावडण्याचा कार्यक्रम शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता, आलापूर येथील त्यांच्या शेतात पाण्याच्या टाकीजवळ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन फपाळ कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले आहे.मंदिराबाई दामोधर फपाळ यांच्या निधनाने एक कर्तव्यदक्ष माता, प्रेमळ आजी आणि संस्कारक्षम गृहिणी काळाच्या पडद्याआड गेल्या असून त्यांचे स्मरण कायम राहील, अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

### रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने आणि संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली, जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेजवळ, बीड येथे रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मनके व सांधे बदली, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी आदी अस्थिरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महागड्या वैद्यकीय सेवेमुळे सर्वसामान्य रुग्णांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, अत्यल्प दरात उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा देण्याचा उद्देश या शिबीरामागे आहे. या शिबिरात संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण अवघ्या ६५,००० मध्ये गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच 'महा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया देखील केली जाणार आहे. याशिवाय, जे रुग्ण या योजनेसाठी पात्र नाहीत, त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CM Relief Fund) अंतर्गत उपचार मिळवून देण्यात येणार आहेत. या शिबिरासाठी प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. रोहन धोत्रे (अहमदनगर) व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तपासणीसाठी नोंदणी शुल्क फक्त १०० असून इच्छुक रुग्णांनी मो. ८२६२००९०९१ या क्रमांकावर संपर्क साधावा. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आपल्या दर्जेदार वैद्यकीय सेवांसाठी राज्यभर प्रसिद्ध असून येथे १,३०० हून अधिक कर्मचारी व २५० पेक्षा जास्त तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत आहेत.

# पवारवाडी - पोहनेर रस्त्याचे वाजले तिनतेरा उस वाहतुकीने रस्त्याची लागली वाट

## आपघाताचे प्रमाण वाढले, आमदार साहेब लक्ष द्या; आठ ते दहा गावातील जनतेची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पवारवाडी येथील जय महेश साखर कारखाना ते पोहनेर पर्यंत असलेल्या रस्त्याचे उस वाहतुक, अवैध वाळु वाहतुकीने तिनतेरा वाले असुन रस्त्याची वाट लागली आहे. परिणामी आपघाताचे प्रमाण वाढले असुन आमदार प्रकाश सोळंके यांनी या रस्त्याकडे लक्ष देत रस्ता दुरूस्त करण्याचे संबंधित विभागास सांगावे अशी मागणी या रस्त्यावर असलेल्या आठ ते दहा गावातील जनतेतुन जोर धरत आहे. तालुक्यातील पवारवाडी ते पोहनेर या रस्त्याला सोन्नाथडी, मोगरा, शुक्लतिर्थ लिंबगाव, मोगरासह आठ ते दहा गावे जोडलेली आहे तर पवारवाडी येथील जय



महेश साखर कारखान्याची सर्वाधिक उस वाहतुक करणा– या ट्रॅक्टरची रेलचेल असते तर गोदावरी नदीतुन अवैध वाळु उपसा करणारी अनेक वाहनांची देखील मोठी वर्दळ या रस्त्यावर दिंद्रुड पोलिसांच्या आशिर्वादाने सुरू आहे. त्यामुळे या रस्त्याची वाट लागली आहे. या गावातील शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना खडतर रस्त्यावरून प्रवास करत शिक्षणासाठी यावे लागते तर दुचाकी चालविणे देखिल अवघड झाले आहे. अनेकवेळा खड्यात दुचाकी स्लिप होउन आपघात देखिल होत आहे. महिला दुचाकीवर असल्यास तर तारेवरची कसरत करत दुचाकी चालवावी लागते असे अनेक दुचाकीस्वार सांगतात. त्यामुळे या रस्स्त्याकडे आमदार महोदयांनी लक्ष देउन तात्काळ हा रस्ता दुरूस्त करावा अशी मागणी जोर धरत आहे.

# महावितरणचा 'वाढदिवस' की नियमांची 'ऐशीतैशी'?

## गेवराईत सरकारी आदेशाला केराची टोपली ; भ्रष्ट युतीची चर्चा ; डॉ. गणेश ढवळेंचा जोरदार प्रहार ; मुख्यमंत्र्याकडे कारवाईची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियमावलीचा धाक उरलाय की नाही? असा संतप्त सवाल गेवराई तालुक्यातील महावितरण उपविभागीय कार्यालयातील एका धक्कादायक प्रकारामुळे उपस्थित झाला आहे. शासकीय कार्यालयात वाढदिवस, निरोप समारंभ व खाजगी कार्यक्रमांवर शासनाने स्पष्ट बंदी घातलेली असतानाही, येथे एका उप–अभियंत्याचा वाढदिवस थाटामाटात साजरा करण्यात आला. या प्रकारामुळे शासकीय शिस्तीची सर्रास पायमल्ली



झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

**काय आहे धक्कादायक प्रकार?**

कार्यालयीन वेळेतच टेबल–खुर्च्या हलवून, केक कापत आणि जल्लोष करत हा कार्यक्रम पार पडल्याचे सीसीटीव्ही फुटेज व स्थानिक माध्यमांच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहे. सरकारी खुर्चीवर बसूनच

> **सरकारी कार्यालय म्हणजे खासगी इस्टेट नाही. नियम पाळायचे नसतील, तर त्या खुर्चीवर बसण्याचा अधिकार संबंधितांना नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई झालीच पाहिजे; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल. – डॉ. गणेश ढवळे (मुख्य प्रचार प्रमुख, माहिती अधिकार कार्यकर्ते महासंघ)**

नियमांना हरताळ फासल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**गुत्तेदारांची उपस्थिती; संशय अधिक गडद–** या तथाकथित 'वाढदिवस सोहळ्या'त शासकीय अधिकाऱ्यांसह खाजगी कंत्राटदारांची (गुत्तेदारांची) लक्षणीय उपस्थिती सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहे. शासकीय कामांचे कंत्राट घेणारे गुत्तेदार आणि त्यांना मंजुरी देणारे अधिकारी यांचे हे 'बर्थडे कनेक्शन' नेमके काय सूचित करते?

सामान्य नागरिकांची कामे वेळेवर न ▶ उर्वरित पान २ वर


### आष्टी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक पदी डॉ. मोराळे यांची नियुक्ती

**आष्टी । प्रतिनिधी**



आरोग्य सेवेत प्रदीर्घ अनुभव असलेले डॉ. रामदास मोराळे यांची आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे ▶ उर्वरित पान २ वर

### आंदोलनाचा इशारा देताच वडवणी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेकडून मागणी मान्य : भाई थावरे



**वडवणी । प्रतिनिधी**

रमाई - मोदी आवास योजने अंतर्गत घरकुलांचे pfms प्रणाली मधून ft द्वारा येणाऱ्या रक्कमेस वडवणी येथील शाखेमध्ये लाभार्थ्यांच्या खात्यांवर होल्ड लावण्यात आले असून हे होल्ड तात्काळ काढण्यात यावेत या मागणीसाठी येत्या २४ डिसेंबर २०२५ रोजी येथील शाखेला टाळे ठोको आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला होता.या प्रश्नी येथील व्यवस्थापक यांनी दखल घेऊन सदरील मागणी मान्य केली आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की,रमाई - मोदी आवास योजने अंतर्गत घरकुलांचे pfms प्रणाली मधून ft द्वारा येणाऱ्या रक्कमेस वडवणी येथील शाखेमध्ये लाभार्थ्यांच्या खात्यांवर होल्ड लावण्यात आले होते. येथील शाखे मधील लाभार्थ्यांच्या खात्यावर पंधरा हजार रुपये वर्ग करण्यात आलेले आहेत. सदरील रक्कमेस होल्ड लावण्यात आलेले आहे. दिनांक १५/ ३/ २०२५ च्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सरपंच, ▶ उर्वरित पान २ वर

### कर्तव्यावर बजावताना पोलिस सुदाम पोकळे यांचा अपघाती मृत्यू ; चिंचाळा गावावर शोककळा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील चिंचाळा गावचे सुपुत्र, तरुण पोलिस कर्मचारी सुदाम राजकुमार पोकळे यांचे कर्तव्य बजावत असताना दुर्दैवी अपघातात निधन झाले. गुरुवारी रात्री अहिल्यानगर जिल्ह्यातील राशीन चौकी परिसरात गस्त घालत असताना एका भरधाव वाहनाने धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. या अपघातात सुदाम पोकळे यांचा जागीच मृत्यू झाला.



सुदाम पोकळे हे शेतकरी कुटुंबातील असून कुटुंबाचा मुख्य आधार होते. त्यांच्या अकाली जाण्याने पोकळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण चिंचाळा गाव शोकसागरात बुडाले आहे. कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक, मनमिळावू व सर्वांशी आपुलकीने वागणारा तरुण म्हणून सुदाम पोकळे यांची ओळख होती. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झटणाऱ्या या शूर पोलिस कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असतानाच आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच चिंचाळा गावासह आष्टी तालुक्यात शोककळा पसरली. अनेक नागरिक, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी ▶ उर्वरित पान २ वर

# भाववाढीच्या "शेतकरी हक्क मोर्चा" साठी मुळुकवाडी शेतकऱ्यांची वज्रमूठ



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांनी आज शुक्रवार, दि. १९ रोजी बसस्थानक परिसरात एकत्र येत भाववाढीच्या शेतकरी हक्क मोर्चा साठी वज्रमूठ आवळली. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या पुढाकाराने आयोजित बैठकीत शेतकरी पुत्र, शेतकरी व शेतकरी मित्रांनी दि. २५ डिसेंबर (गुरुवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे निघणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार केला. बीड जिल्ह्यातील कोरडवाहू शेतकरी कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांना योग्य दर न मिळाल्यामुळे तीव्र आर्थिक संकटात सापडला आहे. कापूस खरेदी केंद्रांवर सीसीआयकडून होणारी पिळवणूक तसेच सोयाबीन खरेदी केंद्रांवरील सरसकट अन्याय सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी यावेळी केला. या अन्यायाविरुद्ध शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी मुळुकवाडी येथे शेतकरी जागृती अभियान अंतर्गत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस ▶ उर्वरित पान २ वर

# तलवाडा येथील मुस्लिम मोहल्ल्यात सार्वजनिक ठिकाणी बांधकाम ग्रामपंचायतचे दुर्लक्ष! : शेख खिजर

### ग्रामपंचायत प्रशासनाने पहाणी करुन संबंधितास प्रतीबंध करावे निवेदनाद्वारे मागणी

**तलवाड़ा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुस्लिम मोहल्ला येथे सार्वजनिक जागेत अनाधिकृत बांधकाम सुरू करण्यात आले आहे व ते तात्काळ थांबवण्यात यावे व झालेले काम काढून घेण्यात यावे यासाठी दिनांक १९ डिसेंबर रोजी





गटविकास अधिकारी सानप साहेब व ग्रामविकास अधिकारी मुसळे साहेब यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांनी लेखी निवेदन दिले व अतिक्रमण धारक खतीब समी अब्दुलरब यांना नोटीस देऊन केलेले अतिक्रमण काढण्या ची मागणी करण्यात आली असून संबंधित अनधिकृत बांधकाम धारक यांच्या नावे ग्रामपंचायत तलवाडा नमुना नंबर ८ मध्ये पी टी आर ला किती जागेची नोद आहे. ग्रामपंचायत यांच्याकडे रीतसर बांधकाम ▶ उर्वरित पान २ वर